# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**जनसंपर्क विभाग**


## सत्र २०२१-२२ करीता विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेबाबत विद्यार्थ्यांना सूचना
## विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांशी संपर्क साधून जाणून घ्यावी माहिती

अमरावती -

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक विभागात प्रवेशित विद्यार्थ्यांचा दरवर्षी विद्यार्थी सुरक्षा विमा काढल्या जातो. यासाठी विद्यार्थी सुरक्षा विमा योजना शुल्क रु. १०/- विद्यार्थ्यांकडून जमा करुन घेतल्या जाते व ती राशी महाविद्यालयाद्वारा विद्यापीठात जमा केल्या जाते. त्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सत्र २०२१-२२ साठी विद्यार्थी सुरक्षा विमा योजना विद्यापीठ स्तरावर राबविल्या जात आहे.

विद्यापीठाने 'दि ओरिएन्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड, डिव्हिजन ऑफिस, राजापेठ, बडनेरा रोड, अमरावती' या कंपनीकडे विमा पॉलिसी काढली असून त्याचा कालावधी दि. २० ऑक्टोबर, २०२१ ते १९ ऑक्टोबर, २०२२ असून पॉलिसी क्रमांक १८२३००/४८/२०२२/२५०८ असा आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षा विमा शुल्क नाममात्र रु. १०/- च्या अनुषंगाने अपघाती निधन झाल्यास तसेच अपघातामध्ये दोन्ही पाय, डोळे व हात किंवा एक पाय, डोळा व हात गमावल्यास रू. २,२५,०००/- एवढी राशी, याशिवाय अपघातामध्ये एक पाय किंवा एक डोळा किंवा एक हात निकामी झाल्यास रू. १,००,०००/- व आणि अपघातात जखमी झाल्यास रु. ५०,०००/- एवढी राशी वैद्यकीय प्रतिपूर्तीकरिता भरपाई म्हणून देण्याचा करार सदर कंपनीशी केलेला आहे.

त्या अनुषंगाने एखादी दुःखद घटना किंवा अपघात झाल्यास त्याबाबतची माहिती पूर्वसूचना लेखी स्वरुपात तीस दिवसाच्या आत 'दि ओरिएन्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड, डिव्हिजन ऑफिस, राजापेठ, बडनेरा रोड, अमरावती' यांना प्रत्यक्ष कळविणे आवश्यक आहे. तसेच यासंदर्भातील कुठलाही दावा महाविद्यालयाने परस्पर सदर विमा कंपनीकडे करणे अनिवार्य आहे. अपघाती निधन झाल्यास वा अपघातात जखमी झाल्यास अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्राची यादी व त्याची सविस्तर माहिती सर्व महाविद्यालयांना पाठविली असून विद्यार्थ्यांना ती माहिती जाणून घ्यावयाची आहे. तरी याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, याशिवाय सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व शैक्षणिक विभागप्रमुखांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेशकुमार सातंगे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १७/११/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी